पीएच. डी. संशोधन आराखडा

“नांदेड जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्राच्या विकासात शासकीय विविध योजनांच्या योगदानाचे भौगीलिक मूल्यमापन”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील विद्या वाचस्पती पदवीकरिता सादर करण्यासाठीचा शोध प्रबंध आराखडा

संशोधक

विशाखा पिराजी मळगे

(एम. ए., बी. एड., एम. एड.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नामदेव केशवराव वाघमारे

(एम. ए., सेट., पीएच. डी.)

भूगोल विभाग प्रमुख,

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय,

सिडको, नांदेड.

संशोधन केंद्र

भूगोल विभाग

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय,

सिडको, नांदेड.

डिसेंबर - २०२४.

१. प्रस्तावना:

भारताला स्वतंत्र मिळून ७७ वर्ष पूर्ण झालेली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताने विविध क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केलेली आहे. परंतू आदिवासी समाज मात्र विकासापासून कोसोदूर अंतरावर आहे. आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी भारतीय संविधानात अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदीचा आधार घेऊन आदिवासी विकासासाठी पंचवार्षिक योजना व वार्षिक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्यविषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतू आजही आदिवासी समाज हा विविध समस्याने ग्रासलेला आहे. आदिवासी समाजामध्ये उत्पनाची पुरेशी साधने व रोजगाराची उपलब्धता नसल्याने दारिद्र्य, बेरोजगारी यामुळे कुपोषनाची समस्या जास्त प्रमाणात दिसून येते. आदिवासींना मिळणारे अपुरे अन्न व पोषणाचा अभाव, धर्म, अंधश्रद्धा, अज्ञान, भोळेपणा, बालविवाह, शोषण, आरोग्यविषयक व शिक्षणाची कमी, रूढी, प्रथा, परंपरा, निरक्षरता आणि कमी सोयी सुविधा असल्यामुळे आदिवासी समाज हा मागासलेल्या अवस्थेत दिसून येतो.

भारतातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ८.६१ टक्के आहे. भारतातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या १०.०८ टक्के आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्र राज्यामध्ये राहते. तर महाराष्ट्र राज्यच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के लोकसंख्या आदिवासी जमातीची आहे. तर नांदेड जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ८.३८ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे.

२. आदिवासी समुदाय:

आदिवासी हे लोक भारतातील मूळ वसाहतकार होत. ते आत्मसंरक्षणास तितकेसे समर्थ नव्हते. जेंव्हा बाहेरून आर्य आणि द्रविड लोक आले, तेव्हा त्यांच्यापुढे आदिवासींचा टिकाव लागला नसल्याने आदिवासी लोक डोंगर, दऱ्या-खोऱ्यात तथा जंगलात आश्रय घेऊन राहू लागले. आजही ते अशाच दुर्गम भागात कायमची वस्ती करून राहिलेले दिसतात. आदिवासी समाजाच्या विविध समस्यांवर नेहमी दुर्लक्ष करणे हे देश हिताचे नाही. आदिवासी समाज म्हटला की, जंगलात वनामध्ये, दुर्गम डोंगर, दऱ्या-खोऱ्यात राहणारा व त्यांची स्वत:ची एक वेगळी अशी संस्कृती असणारा आदिवासी समूह आहे.

आदिवासी कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सन १९७२ मध्ये समाजकल्याण विभागातर्गत आदिवासी विकास संचालनालयाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. २२ एप्रिल १९८३ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणाकरिता सन १९९२ मध्ये आदिवासी विभाग संचनालय हे आदिवासी विकास आयुक्तालयात म्हणून विलीन करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये विविध प्रमाणात आदिवासी समाज वसलेला आहे. त्यात गोंड, कोलाम, परधान, आंध, पारधी, भिल्ल या जमाती आढळतात. तेथील आदिवासी गोंड जमात ही अंधश्रध्दाळू आहे. गोंड जमातीमध्ये देव-देवतांना जास्त महत्त्व आहे. गोंड या जमातीचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. गोंड जमात आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असल्यामुळे विविध कल्याणकारी योजनामुळे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे.

अभ्यास क्षेत्रातील कोलाम या आदिवासी जमातीची वस्ती दुर्गम व डोंगर भागात आहे. या जमातीचाही मुख्य व्यवसाय शेती हा आहे. तसेच या वस्तीला कोलामपोड वस्ती असेही म्हटले जाते. या जमातीस कोलाम नाईक या नावाने सुद्धा ओळखले जाते. नांदेड जिल्ह्यामध्ये गोंड व परधान याचे समान संघटन, देवदैवत, कुळव्यवस्था यात सांस्कृतिक समानता आढळते. या जमातीत आरोग्याविषयक समस्या भगताच्या सहाय्याने ठीक केल्या जातात. या जमातीत बऱ्याच सुधारणा झालेल्या आहेत.

आंध जमात ही महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासीपैकी एक आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते. या जमातीत इतर जमातीच्या तुलनेत भूमीहीनांचे प्रमाण कमी आहे. आंध जमात ही अल्पभूधारक आहे. आदिवासी विकास व कल्याणकारी योजनामुळे ही जमात शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या सुधारत असली तरी काही परंपरा कायम आहेत.

३. विषय निवड व अभ्यास क्षेत्राची निवड :

नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाज हा मराठवाड्यातील एक अति दुर्गम आदिवासी समाज आहे. या जिल्ह्यातील आदिवासी समाज अनेक समस्याने ग्रासलेला आहे. आधुनिक काळातील भारताच्या विविध भागात विकासाचा प्रवाह वाहत असताना मात्र नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाज विविध समस्याने ग्रासलेला आहे. आजही त्यांच्या मुलभूत गरजा या पूर्ण झालेल्या नाहीत. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समूहाच्या लोकसंख्येची वैशिष्ट्ये, लोकसंख्येच्या समस्या, आदिवासी विकास योजना व आदिवासींच्या विकासात विविध योजनांची भूमिका, आदिवासी विकास योजनेतील अडथळे अशा विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

सदर संशोधासाठी महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेस असलेल्या नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. आदिवासी समाज हा आधुनिक काळातही सर्व दृष्टीने अतिशय मागास आहे. आदिवासींच्या या मागासपणाचा शोध घेण्याची इच्छा खूप दिवसापासून होती. संशोधक हा नांदेड जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्यामुळे इतर कोणत्याही प्रदेशातील आदिवासी समूहाच्या विकासाचा अभ्यास करण्याऐवजी आपण राहत असलेल्या जिल्ह्यातील आदिवासींच्या क्षेत्रातील विकासाची नेमकी स्थिती जाणून घेण्यासाठी या विषयाची व क्षेत्राची निवड करण्यात आली आहे.

नांदेड जिल्हा उत्तर अक्षांश १८° १६’ व १९° ५५’ व पूर्व रेखांश ७६° ५६’ ते ७८° १९’ या दरम्यान पसरलेला आहे. तो भौगोलिकदृष्ट्या खंडांतर्गत स्थितीनुसार महाराष्ट्र राज्याच्या मध्यपूर्व भागात, अरबी समुद्र व बंगालचा उपसागरा पासून दूर व भारतीय भूखंडाच्या मध्यांतर्गत भागात वसलेला आहे.

४. अभ्यास विषयाचे महत्त्व:

भारतीय समाज व्यवस्थेचा एक महत्वाचा भाग म्हणजे आदिवासी समूह हा आहे. हा समूह भारतीय स्वातंत्र्याची ८ दशके पूर्ण होत आलेली असतानाही विकासाला प्रवाहापासून वंचित आहे. नांदेड जिल्ह्यातील अशा वंचित आदिवासी समूहाच्या एकूणच स्थितीची माहिती सदर संशोधन कार्यातून मिळणार आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समूहाच्या लोकसंख्या वैशिष्ट्ये, आदिवासी समूहाच्या विविध समस्या, आदिवासी समूहासाठीच्या विकास योजना व विकास योजनेतील अडथळ्यांचा शोध घेऊन ही अडथळे सोडविण्यासाठी सदर संशोधन कार्य अतिशय महत्त्वाचे ठरेल. सदर संशोधन कार्यामुळे आदिवासी समूहाच्या लोकसंख्येची वैशिष्ट्ये, समस्या व विकास योजनेतील अडथळ्यांचा शोध घेण्यात येणार आहे. या सर्व घटकांचा अभ्यास आदिवासी विकास योजण्याच्या नियोजनासाठी व आदिवासी समूहाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनास, समाजशात्रज्ञ, संशोधक व आदिवासी समाजाच्या अभ्यासकास महत्त्वाचा ठरणार आहे.

५. उद्दिष्ट्ये :

प्रस्तूत संशोधणासाठी खालील उद्दीष्ट्ये ठरवण्यात आलेली आहेत.

१. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी समाज वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

२. आदिवासी समाजांच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

३. आदिवासी क्षेत्रासाठीच्या विकासातील विविध शासकीय योजनाचा अभ्यास करणे.

४. आदिवासींच्या विकासातील विविध शासकीय योजनांचे योगदान अभ्यासणे.

५. आदिवासी क्षेत्र विकास योजनेतील अडथळे शोधून उपाययोजना सुचविणे.

६. माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती:

सदर संशोधन विषयाशी संबंधित माहिती प्राप्त करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक स्वरूपाच्या माहिती स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधन क्षेत्रात संशोधक प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षणाचा उपयोग करणार आहे. तर द्वितीय स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी विविध कार्यालयाचे अहवाल, संशोधन अहवाल, शोध निबंध, जनगणना अहवाल, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी विकासाच्या संदर्भातील विविध कार्यालयाचे अहवाल व विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथांचा उपयोग करण्यात येणार आहे.

विविध माहिती स्त्रोतांच्या आधारे प्राप्त केलेल्या माहितीचा परस्पर कार्यकारण संबंध स्पष्ट करून सत्य शोधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. प्राप्त आकडेवारीचे सादरीकरण करून आवश्यक संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच आकडेवारीचे सादरीकरण करण्यासाठी विविध नकाशाशात्रीय पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

७. संबंधित साहित्यांचा आढावा :

१. के. सिता आणि फडके (१९८१): यांनी पश्चिम भारतातील सह्याद्रीच्या प्रदेशातील आदिवासी जमातीच्या समस्यांचा सूक्ष्म स्थरावर अभ्यास केलेला आहे. जंगल कायदा अंमलात आला तेव्हा जंगलातील लाकूड, बांबू, तेन्दूचे पाने, फळे तोडण्यावर बंदी करण्यात आली. शिकार करण्यावर बंदी करण्यात आली. तेंव्हापासून आदिवासींच्या हाल-अपेष्ठांना सुरूवात झाली.

२. के. एस. युसुफ (१९९०): यांनी पश्चिम महाराष्ट्रातील लोकसंख्या वैशिष्ठ्यांचा अभ्यास या विषयावर पीएच. डी. संशोधन कार्य केले आहे. यामध्ये त्यांनी विविध वैशिष्ठ्यांचा अभ्यास करताना लिंग गुणोत्तर आणि व्यावसायिक रचनेवर प्रकाश टाकला आहे.

३. उपाध्याय (२०००): यांच्या संशोधनानुसार स्वातंत्र्यानंतर भारत व राज्य सरकारने आदिवासीच्या प्रगतीसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. बदलत्या काळानुसार त्यात बदलही केले आहेत. त्यामुळे आदिवासींच्या जीवनात सुधारणा घडून येत आहेत.

४. शैलता देवगावकर व इतर (२००१): यांनी आदिवासी समाजाच्या विविध योजना यांच्यापर्यंत पूर्णपणे पोहोचा नाही. यामुळे आदिवासी लोकांना योजनांचा फायदा होत नाही. या लेखकांनी आदिवासींची मुले, प्रोढ स्त्री-पुरुष ही कुपोषित असतात. असा अभ्यास केला आहे.

५. ओरम ज्वेल (२००३): या संशोधकांनी “अनुसूचित जमातीची उन्नती” या संशोधनात आदिवासींना उपयुक्त विविध योजना, उपक्रम घटनेतील विविध तरतुदी काळाच्या कसोटीवर तपासणे आवश्यक आहे असे नमूद केले.

६. प्रमोद मनघूटे (२००७): यांनी आपल्या आदिवासी साहित्य स्वरूप व समस्या यामध्ये आदिवासींची वर्तमान स्थिती सांगितली आहे. यांच्या मते आदिवासी जीवन वनावर अवलंबून असते.

७. मारोती तेगमपूर (२००९): या संशोधकांनी आदिवासी जमातीच्या किनवट तालुक्यातील विविध समस्यांचा अभ्यास केलेला आहे. आदिवासींच्या विविध योजनांची माहिती यांना माहित नसल्याने आणि योजनेचा मंजूर निधी पूर्णपणे खर्च केला जात नाही असे सांगितले आहे.

८. एन. के. वाघमारे (२००९): यांनी नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वैशिष्ठ्यांच्या भौगोलिक अभ्यास या विषयावर पीएच. डी. शोध प्रबंध सादर केलेला आहे. त्यात लोकसंख्येच्या विविध वैशिष्ठ्यांचा अभ्यास केलेला आहे. यांच्या मते आदिवासी जीवन हे वनावर अवलंबून असते.

९. एस. एस. तोळमारे (२०१०): यांनी शीखधर्मीय लोकसंख्येच्या भौगोलिक लोकसंख्या शास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषयावर पीएच. डी. शोध प्रबंध सादर केला आहे. यात त्यांनी नांदेड जिल्ह्यातील शीख धर्मीय लोकसंख्येच्या संदर्भात वयोगट रचना, लिंग, रचना, ग्रामीण-नागरी व व्यावसायिक रचना इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

१०. चंद्रकांत (२०१०): यांनी आदिवासी कातकरी जमातीच्या विविध समस्यांच्या संदर्भामध्ये संशोधन कार्य केले आहे. आदिवासी समाज हा समस्याने ग्रासलेला आहे आणि बेरोजगारी, दारिद्र्य, रोजगारासाठीचे स्थलांतर, निरक्षरता, मुलभूत सुविधांचा अभाव या समस्या आदिवासी जमातीत स्पष्ट केल्या आहेत.

११. मुखर्जी (२०१२): यांनी नैसर्गिक पर्यावरण परिसरातील लोकांना अनेक सेवा, साधने, पदार्थ उपलब्ध करून देत असतो. नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून घेतल्याने आदिवासी जीवन अडचणीत आले. कारण त्यांचे जीवन निसर्गावरच अवलंबून असते.

१२. मानकरे (२०२२): यांनी ठाणे पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास या विषयावर पीएच. डी. शोध प्रबंध सादर केला. आदिवासी जमाती आणि आदिवासी लोकसंख्या वाढ व वितरण यावर अभ्यास करण्यात आला. आदिवासी जमातीच्या लोकसंख्येची सामाजिक व आर्थिक स्थितींचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

८. प्रकरण योजना:

सदर संशोधन कार्य खालील संभाव्य प्रकरणाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. संशोधन कार्य करत असताना प्राप्त माहितीनुसार या प्रकरणामध्ये बदल करण्यात येतील. सदर संशोधन विषयाच्या अहवालाची मांडणी खालील सात प्रकरणात करण्यात येणार आहे.

१. प्रकरण पहिले :- प्रस्तावना
२. प्रकरण दुसरे : अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी
३. प्रकरण तिसरे : आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये
४. प्रकरण चौथे : आदिवासी समजाच्या समस्या
५. प्रकरण पाचवे : आदिवासींच्या क्षेत्र विकासातील विविध शासकीय योजनांचे योगदान
६. प्रकरण सहावे : आदिवासी क्षेत्र विकास योजनेतील अडथळे
७. प्रकरण सातवे : निष्कर्ष व उपाययोजना

संदर्भ:-

१. संतोष. एस. सोंडगे (२०२२): “बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंग गुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास.” प्रकाशित केलेला पिएच. डी. शोध प्रबंध. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
२. डॉ. प्रदीप आगलावे (२००७): “सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे.” श्री साईनाथ प्रकाशन १, भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर-१० पृष्ठ क्रं. १७९ ते २०६.
३. ब्रम्हानंद. मा. बोईवारे (२०२४): “नांदेड जिल्ह्यातील आरोग्य सुविधाचा भौगोलिक अभ्यास.” अप्रकाशित पिएच. डी. शोध प्रबंध. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
४. डॉ. एन. के. वाघमारे (२०१९): “नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यातील आदिवासी विकासाच्या समस्या.” अप्रकाशित लघू शोध प्रबंध. यू. जी. सी.- डब्लू. आर. ओ. पुणे.
५. देवगावकर शैलाता व इतर (२००१): आदिवासी विश्व आनद प्रकाशन, नागपूर.
६. ओरम ज्वेल (२००३): यांनी “अनुसूचित जमातीची उन्नती योजना, वर्ष ३१, अंक १, ऑगस्ट २००३.
७. तेगामापूर मारोती (२००९) आदिवासी विकास आणि वास्तव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
८. चंद्रकांत पुरी (२०१०): आदिवासी समाजाचा विकास एक चिकित्सक अभ्यास, परममित्र पब्लिकेशन, ठाणे.

संशोधक

विशाखा पिराजी मळगे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नामदेव केशवराव वाघमारे